जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की, **पीस बर्ड प्रिमायसेस को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड** यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मालमत्तेचे पुनर्विकास हक्क आमच्या पक्षकारास प्रदान केले आहेत (यापुढे संक्षेपाने ''**सदर मालमत्ता**'') आणि त्यानुसार आमचे पक्षकार सदर मालमत्तेच्या प्रस्तावित पुनर्विकासासाठी एमबीआरआरबी, बीएमसी तसेच इतर संबंधित प्राधिकरणांकडून आवश्यक परवानग्या मिळविण्याच्या प्रक्रियेत आहेत.

सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत, ''शाह बिल्डिंग क्र. ६'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील निवासी फ्लॅट्स तसेच बिगर निवासी युनिट्स/भाडेकरू जागांसह, कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य, लाभ, दावा किंवा मागणी असलेल्या **सर्व** व्यक्तींनी, ज्यात कोणत्याही बँका आणि/किंवा खाजगी वित्तपुरवठा करणाऱ्या कंपन्यांचा समावेश आहे, विक्री, हस्तांतरण, असाइनमेंट, तारण, ताबा, अदलाबदल, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, ट्रस्ट, भेट, बोजा, सुविधाधिकार, ग्रहणाधिकार, वारसा, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड किंवा विकास हक्क/उप–विकास हक्क, संयुक्त विकास हक्क, एफएसआय किंवा टीडीआर वापरासंबंधी करार, भागीदारी, संयुक्त उपक्रम, एसपीव्ही करार, प्रकल्प व्यवस्थापन करार किंवा कोणत्याही वाटप, करार, दस्त, कागदपत्र किंवा न्यायालयाच्या कोणत्याही आदेश किंवा हुकूमाद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे असलेले सर्व दावे, लेखी स्वरूपात व त्यासंबंधित कागदपत्रीय पुराव्यासह अधोहस्ताक्षरी यांना खाली नमूद पत्त्यावर या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावेत. अन्यथा, असे सर्व दावे अस्तित्वात नाहीत किंवा त्याग केलेले व सोडून दिलेले समजले जातील.

सदर संदर्भित परिशिष्ट

सर्व तो भाग व विभाग असलेली जमीन, अंतिम प्लॉट क्र. १५७, टाउन प्लॅनिंग स्कीम क्र. ३, माहिम विभाग, उपविभाग प्लॉट क्र. ९, क्षेत्रफळ अंदाजे ११२५ चौ. यार्ड किंवा ९४०.६५ चौ. मीटर, तसेच त्यावर उभ्या असलेल्या इमारती, रचना व भाडेकरू जागांसह, ''शाह बिल्डिंग क्र. ६'' म्हणून ओळखली जाणारी आणि महानगरपालिका नोंदीत वॉर्ड क्र. जी–४०५१ (१–२), टी.एच. कटरिया मार्ग (पूर्वीचे नाव लेडी हार्डिंग रोड), येथे नोंद असलेली, मुंबईतील कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ५४२ चा भाग असून खालीलप्रमाणे सीमांकित:

उत्तरेस : टी.एच. कटरिया मार्ग (पूर्वीचे नाव लेडी हार्डिंग रोड)

पूर्वेस : प्लॉट क्र. १५७ (८–१०), टीपीएस III, माहिम

दक्षिणेस : प्लॉट क्र. १५७ (८–१०), टीपीएस III, माहिम

पश्चिमेस : प्लॉट क्र. १५७(१), टीपीएस III, माहिम

दिनांक: ०६ मे, २०२६

सही/–

कदम अँण्ड कंपनी

ॲडव्होकेट्स

३०५–३०६, ३ रा मजला, युसुफ बिल्डिंग,

एम.जी. रोड, फोर्ट,

मुंबई – ४००००१.

जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार, आम्ही, याखाली दिलेल्या **अनुसूची**मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेसंदर्भात (**"मालमत्ता"**) १०१, कल्पतरु सिनर्जी, ग्रँड हयात समोर, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – ४०००५५ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली **कल्पतरु प्रॉपर्टीज लिमिटेड** (पूर्वी 'कल्पतरु प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड' म्हणून ओळखली जाणारी) (सीआयएन: U41000MH1975PLC018371) (**"केपीएल"**) यांच्या अधिकाराची, मालकी हक्काची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

केपीएल हे सदर मालमत्तेवर महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरणाकडे कल्पतरु अझुरो या नावाने नोंदणीकृत असलेला एक स्थावर मालमत्ता प्रकल्प विकसित करण्याच्या प्रक्रीयेत आहे (**"प्रकल्प"**).

सर्व व्यक्तींचे (i) मालमत्तेमधील आणि तिच्या कोणत्याही भागामधील; आणि/किंवा (ii) विकास क्षमतेमधील (मालमत्तेसंबंधित हस्तांतरणीय विकास हक्क आणि/किंवा चटई क्षेत्र निर्देशांक यांच्या समावेशासह); आणि/किंवा (iii) प्रकल्पातील न विकल्या गेलेला साठा/सदनिका / युनिट्समधील केपीएल यांच्या अधिकार/मालकी हक्क/हितसंबंधा विरोधात/वर/संदर्भात गहाणवट, मालकी हक्काचे कागदपत्रे गहाण ठेवून, ऋणभार, विक्री, विक्रीसाठी करार, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टी, भाडेपट्टीचा करार, उप–भाडेपट्टी, उप–भाडेपट्टीचा करार, कुळ, परवाना, उप–परवाना, धारणाधिकार, भार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, भेट, प्रलंबीत दावे, विनिमय, हिस्सा, लाभार्थी हितसंबंध, ताबा, मुक्तता, त्याग, विभाजन, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसिहत, वारसा, फ्लोअर स्पेस इंडेक्स, विकास अधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, ताबा, वाटणी, कोणत्याही न्यायालयाचा किंवा इतर कोणत्याही वैधानिक किंवा न्यायनिर्णायक प्राधिकरणाचा आदेश/हुकूमनामा/निर्देश, किंवा इतर कोणत्याही पद्धतीने किंवा अन्यथा कसेही कोणताही दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप (**"दावे"**) असल्यास त्यांनी याद्वारे खैतान ॲण्ड कंपनी, ॲडव्होकेट यांना वन वर्ल्ड सेन्टर, १३वा मजला, टॉवर–१सी, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. हर्ष परिख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेलवर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत आवश्यक सहाय्यक कागदपत्रांच्या प्रतींसह लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, मालमत्ता / मालमत्तेच्यासंदर्भातील विकास क्षमता / प्रकल्प यांच्या संदर्भात असा कोणताही दावा, अधिकार, मालकी हक्क, इस्टेट किंवा हितसंबंध अस्तित्वात नाही असे मानले जाईल आणि ते दावे माफ केले आहेत किंवा सोडुन दिले आहेत आणि/किंवा ते केपीएल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नाहीत असे समजले जाईल.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

मुंबई शहर जिल्ह्यातील २४/२४ए, एल. जगमोहनदास मार्ग, मुंबई – ४००००६ येथे स्थित आणि वसलेले मलबार आणि कंबाला हिल विभागातील कॅडस्ट्रल सर्व्हे क्रमांक ३/५९० (पार्ट) असलेला मोजमापीत ६४९.१७ चौरस मिटर्स आणि कॅडस्ट्रल सर्व्हे क्रमांक ४/५९० असलेला मोजमापीत ३६२.३८ चौरस मिटर्स असे एकूण मोजमापीत १,०११.५५ चौरस मिटर्स फ्रीहोल्ड जमिनीचा किंवा भूखंडाचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

उत्तरेकडे वा त्या दिशेला : मलबार आणि कंबाला हिल विभागातील सी.एस. क्र. १/५९० असलेली जमिन

दक्षिणेकडे वा त्या दिशेला : मलबार आणि कंबाला हिल विभागातील सी.एस. क्र. २/५९० असलेल्या जमिनीचा अंशत: भाग आणि अंशत: एल. जगमोहनदास मार्ग

पूर्वेकडे वा त्या दिशेला : अंशत: एल. जगमोहनदास मार्ग आणि मलबार आणि कंबाला हिल विभागातील सी.एस. क्र. १/५९० असलेल्या जमिनीचा अंशत: भाग

पश्चिमेकडे वा त्या दिशेला : मलबार आणि कंबाला हिल विभागातील सी.एस. क्र. २ए/५९० असलेल्या जमिनीचा अंशत: भाग आणि सी.एस. क्र. २/५९० असलेल्या जमिनीचा अंशत: भाग

आज दिनांक ६ मे २०२६

खैतान अँन्ड कंपनी करीता

सही /–

हर्ष परिख

भागीदार

उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत,

बांद्रा (पू), मुंबई - ४०००५१.

दूरध्वनी क्र. - ०२२-२६५१०१३६

Email ID. - sdomsdest@gmail.com

क्र. आरटीएस/संकिर्ण/एसआर-०९/२०२६

सुनावणीची जाहीर नोटीस

१) निर्मला सुभाष सुद

२) लोरेन्स इनास डिसोजा

७०१-अ, मिरा को.ऑ.हौ.सो.लि., न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई - ४०००५३. --------**अपिलार्थी**

विरुध्द

१) तहसीलदार अंधेरी

२) करीमजी सुलेमानजी नगरवाला पंचायत रेसीडन्सी, काश्मिरा ठाणे.

३) बी. आर. करंजीया

४) खोरशेत बी. करंजीया

५) नवल बरजोरजी करंजीया

६) होशी बरजोर करंजीया, फॉग्रेन कॅस्टल इमारत, ग्रांट रोड, मुंबई - ४००००७.

७) दि सेक्रेटरी, तरुण भारत को.ऑ.हौ.सो.लि. तरुण भारत प्लॉट नं. २१ व २४, चकाला अंधेरी (पू), मुंबई - ४०००९९.

८) दि सेक्रेटरी, इंडियन एअरलाईन्स निलगगन स्टाफ को. ऑ. हौ. सो. लि. तरुण भारत प्लॉट नं. २१ व २४, चकाला अंधेरी (पू), मुंबई - ४०००९९.

९) मंडळ अधिकारी मरोळ

१०) तलाठी सझा गुंदवली --------**प्रतिवादी**

विषय: महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल अपिल.

अपिलार्थी यांनी मौजे-चकाला, ता. अंधेरी येथील स.क्र. १९/१२ व स.क्र. ९९/१३अ या मिळकती संदर्भात फेरफार क्र. ८०७, ८२४, ९१८, १०५९, १३५३, १८६१ विरुध्द न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या सोबत विलंब माफीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जावर सुनावणी **दि. १२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** उपरोक्त नमूद पत्यावरील कार्यालयात होणार आहे.

सदर प्रकरणी आपण स्वत: किंवा प्राधिकृत विधी व्यवसायीमार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहावे. वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास किंवा आपणा मार्फत लेखी अथवा तोंडी जबाब/युक्तीवाद सादर न केल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून कागदपत्रांच्या गुणवत्तेनुसार अपील प्रकरणांत आदेश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

सामनेवाले यांचे नावे: २) करीमजी सुलेमानजी नगरवाला पंचायत रेसीडन्सी, काश्मिरा ठाणे., ३) बी. आर. करंजीया, ४) खोरशेत बी. करंजीया, ५) नवल बरजोरजी करंजीया, ६) होशी बरजोर करंजीया, फॉग्रेन कॅस्टल इमारत, ग्रांट रोड, मुंबई - ४००००७.

स्वाक्षरी

(प्रशांत ढगे)

ठिकाण: वांद्रे (पूर्व) **उपविभागीय अधिकारी**

दिनांक: २९/०४/२०२६ **मुंबई पश्चिम उपनगर**

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

शाखा पत्ता:– खेतवाडी शाखा, बँक ऑफ बडोदा, ३२९/३३५, श्रीनिवास बिल्डिंग, एस. व्ही. पी. रोड, ७वी खेतवाडी समोर, मुंबई ४००००४.

लॉकर तोडुन उघडण्याची सूचना

भाडे जे लॉकर धारक आणि बँकेच्या दरम्यान निष्पादित सेफ डिपॉझिट लॉकर करारानुसार प्रदान न केल्याच्या परिणामी संपुष्टात आणण्याची सूचना आणि तोडुन उघडण्याची सूचना ही त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर खालील लॉकर धारकांना पोस्टाने पाठविण्यात आली होती. तथापी सदर सूचना न बजावता परत आल्या आणि सदर लॉकर करारानुसार सर्व इतर प्रयत्न करुनही लॉकर धारकांची प्रतिसाद दिलेला नाही किंवा तपास लागत नाही.

अनु. क्र.	शाखा	लॉकर धारकाचे नाव	पत्ता	सूचनेची तारीख	लॉकर क्र.	दिनांक १६–०४–२०२६ रोजीचे थकीत भाडे
१	खेतवाडी	अतुल चंपकलाल शाह आणि शीला अतुलकुमार शाह	२२/१३, खेतवाडी मेन रोड, एडुल एआयई अपार्टमेंट, ब्लॉक क्र. ७, मुंबई–४००००४	१७–०४–२०२५ आणि १०–१०–२०२५	०४०१एएक्स०४ ९१ (६९३ ए)	१६८७४
२	खेतवाडी	जयश्रीबेन भीखालाल शाह, मफतलाल मालुकचंद शाह आणि प्रविणकुमार मफतलाल शाह	रूम क्र.३२, २रा मजला, जे.एन. जेठवाणी बिल्डिंग, मुंबई–४००००४	१७–०४–२०२५ आणि १०–१०–२०२५	०४०१एएक्स०० ८८ (१०१ ए)	१९८२४
३	खेतवाडी	शांता खेराज शाह आणि निर्मला मणिलाल शाह	२१२/२१८, गोवर्धन भवन, खेतवाडी, ११ वी लेन, १ ला मजला, रूम क्र. १०, मुंबई–४००००४	१३–०२–२०२५ आणि १०–१०–२०२५	०४०१एएक्स०० ६४ (७४ ए)	१७४०५
४	खेतवाडी	गुणवंती रासिकलाल जोगाणी आणि निलेश रासिकलाल जोगाणी	१२ वी खेतवाडी लेन, झवेरी बिल्डिंग, दुसरा मजला, रूम क्रमांक २८, मुंबई ४००००४ व सी ७०२ जय हरी सीएचएस लि., फोरजेट स्ट्रीट, भाटिया हॉस्पिटल समोर, नाना चौक जवळ, मुंबई ४०००३६	१३–०२–२०२५ आणि १०–१०–२०२५	०४०१एएक्स०३ ३९ (५२० ए)	१४४५७

वरील लॉकर कराराच्या तरतुदींनुसार आम्ही तुम्हाला याद्वारे सूचना देतो की, सदर सूचनेच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत लॉकर स्वाधीन केले नाही आणि लॉकरची चावी परत केली नाही तर आम्ही **११–०८–२०२६ रोजी स. ११.०० वा.** तुमच्या उपस्थिती किंवा शिवाय तुमचे लॉकर तोडुन उघडण्याची कार्यवाही करु आणि लॉकर तोडुन उघडतेवेळीची काही असल्यास लॉकरमधुन मिळालेल्या वस्तूंची वस्तूसूची तयार करण्यात येईल. पुढे थकीत भाडे, दंड, प्रभार, तोडुन उघडण्याचे चार्जेस आणि इतर खर्च तुमच्याकडुन वसुल करण्यात येईल आणि लॉकरमधील वस्तूंसह निष्पादित लॉकर करार आणि कायद्यानुसार व्यवहार करण्यात येईल.

कृपया नोंद घ्यावी की, वरील संदर्भात बँकेने केलेली कोणतीही कारवाई ही बँकेला उपलब्ध हक्क, उपाय आणि वादाला बाधा येऊ न देता आहे आणि ती तुमचा खर्च, दायित्त्व, जोखीम आणि जबाबदारा आणि परिणामांवर राहिल आणि बँक कोणत्याही बाबतीत जबाबदार राहणार नाही.

दिनांक : ०५.०५.२०२६ **शाखा प्रमुख/प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : मुंबई **बँक ऑफ बडोदा**

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तळ मजला, आकृती सेंटर, एमआयडीसी, टेलिफोन एक्सचेंज जवळ, आकृती स्टारच्या समोर, अंधेरी पूर्व, मुंबई– ४०००९३

जाहीर सूचना – तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई– लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

ही स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव सूचना आयसीआयसीआय बँक लि. ने जारी केली आहे (दीवाण हाऊसिंग फायनान्स लि. कडून. आयसीआयसीआय बँकेला मुखत्यार म्हणून अधिकार मिळाले आहेत), डीएचएफएल आणि खालील कर्जदार यांच्यात झालेल्या कर्ज करारानुसार देण्यात. आलेल्या कर्ज सुविधेशी निगडीत तारण मालमत्ता सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) नुसार ताब्यात घेतल्यासंबंधाने ही सूचना आहे.

सर्वसाधारण लोकांना आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना इथे सूचना देण्यात येते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता ही सिक्युअर्ड क्रेडीटर. यांच्याकडे गहाण/चार्ड असून, त्याचा प्रत्यक्ष ताबा आयसीआयसीआय बँकेचे अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे, तिची विक्री 'जे आहे जिथे आहे,' आणि 'जे आहे काय आहे', आणि 'जे काही आहे ते आहे' बेसिसवर तपशील दिल्याप्रमाणे होणार आहे.

अ. क्रं.	कर्जदाराचे/सह–कर्जदाराचे/हमीदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ	ई–लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्री सत्यविजय विलास भोगटे (कर्जदाराचे) श्रीमती संपदा सत्यविजय भोगटे (सह–कर्जदाराचे) कर्ज खाते क्र.– QZTNE00005017420	फ्लॅट क्रमांक ६०१, सहावा मजला, विंग ए–१, भागीरथी विश्व, सर्वेक्षण क्रमांक ४१, घर क्रमांक २/५, २/६, २/७, २/८, २/९, प्लॉट क्रमांक २, ३, ४, ५, ६, श्री कृष्ण नगर जवळ, आपटे वाडी, शिरगाव बदलापूर पूर्व, तालुका–अंबरनाथ, जि. ठाणे, ठाणे–४०१२०८. मोजमापित क्षेत्र–४०३.८७ चौरस फूट म्हणजेच ३७.५२ चौरस मीटर कार्पेट एरिया.	₹ ८,३५,२९५/- (एप्रिल २८, २०२६ पर्यंत)	₹ १९,००,०००/- / ₹ १,९०,०००/-	मे २५, २०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत	जून ११,२०२६ सकाळी ११:०० पासून
2.	श्री.प्रताप रुस्तुमराव खटींग (कर्जदाराचे) श्रीमती वंदना रुस्तम खटिंग (सह–कर्जदाराचे) कर्ज खाते क्र.– QZABN00005008676	फ्लॅट क्रमांक ६०७, सहावा मजला, बी विंग, इमारत ''सत्यम शीला'', सर्वे क्रमांक ७२, हिस्सा क्रमांक ४, सर्वे क्रमांक ७३, हिस्सा क्रमांक १बी, जवळ... आर्यन वन, गाव–शिरगाव, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, बदलापूर पूर्व, बदलापूर– ४२१५०३ मोजमापित क्षेत्र–२९३ चौरस फूट कार्पेट एरिया.	₹ १३,७१,०६१/- (एप्रिल २८, २०२६ पर्यंत)	₹ १४,५०,०००/- / ₹ १,४५,०००/-	मे २५, २०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत	जून ११,२०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव युआरएल लिंक– (URL Link-https://BidDeal.in) **व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड** या ई–लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **जून १०, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लेवल ३-५, ७४ टेक्नो पार्क, सीप्झ गेट क्रमांक ०२ समोर, मरोल एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००९३** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **जून १०, २०२६** रोजी **दुपारी ०२.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **जून १०, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह – डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लेवल ३-५, ७४ टेक्नो पार्क, सीप्झ गेट क्रमांक ०२ समोर, मरोल एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००९३** येथे **जून १०, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/ वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **"आयसीआयसीआय बँक लिमिटेड"** यांच्या नावे **मुंबई** येथे देय सादर करावा.

पाहणीसंबंधित, ई–लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया संपर्क **आयसीआयसीआय बँक** कर्मचारी फोन नंबर **९८३३६९९०१३/८१०४५४८०३१/९१६८६८८५२९** वर संपर्क करा.

कृपया नोंद घ्यावी की मार्केटिंग एजन्सीज **१. व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, २. ऑजिओ ॲसेट्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, ३. मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड, ४. फिनविन इस्टेट डील टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ५. गिरनारसॉफ्ट प्रायव्हेट लिमिटेड ६. हेक्टा प्रॉप टेक प्रायव्हेट लिमिटेड, ७. आर्का एमार्ट प्रायव्हेट लिमिटेड, ८. नोव्हेल ॲसेट सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ९. नोब्रोकर टेक्नॉलॉजीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, १०. नवोदयन् प्रॉपटेक प्रायव्हेट लिमिटेड** यांनादेखील सदर मालमत्तेच्या विक्री सुविधेसाठी नेमण्यात आले आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.

विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : मे ०६, २०२६ **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : मुंबई **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

TATA CAPITAL LIMITED

नोंदणीकृत कार्यालय: ११ वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई–४०००१३

सीआयएन: यु६५९९०एमएच१९९१पीएलसी०६०६७०

दूर.: क्र.: ०२२–६६०६ ९०००, फॅक्स: ०२२–६६५६ २६९९, वेबसाईट: www.tatacapital.com

टपाल मतदान सूचना आणि ई–व्होटींगची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, टाटा कॅपिटल लिमिटेड (**'कंपनी'**) ला खालील ठरावावर रिमोट ई–व्होटींग मार्फत टपाल मतदानाच्या माध्यमातून सभासदांची ('सभासद') मंजुरी हवी आहे:

ठरावाचा प्रकार	ठरावाचे वर्णन
सामान्य ठराव	टाटा स्टील लिमिटेड शी महत्त्वाचे संबंधित पक्षकार व्यवहार

टपाल मतदान सूचना (**'सूचना'**) कंपनीची वेबसाईट www.tatacapital.com वर, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**'एनएसडीएल'**) ची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेड (**'बीएसई'**) च्या www.bseindia.com येथे आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ('एनएसई') च्या www.nseindia.com येथे उपलब्ध आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या तरतुदी आणि निगम व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या ८ एप्रिल, २०२० दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. १४/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित १७/२०२० आणि ह्या बाबतीत जारी केलेली नंतरची सर्क्युलर्स, अलिकडचे २२ सप्टेंबर, २०२५ दिनांकित ३/२०२५ (एकत्रित उल्लेख **'एमसीए सर्क्युलर्स'**) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ च्या अनुपालनात कंपनीने ज्यांचे ई–मेल अँड्रेसेस रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट/डिपॉझिटरीज/कंपनीकडे नोंदवली आहेत आणि १ मे, २०२६ (**'कट–ऑफडेट'**) रोजीस ज्यांची नावे सभासदांच्या नोंदवहीत/डिपॉझिटरीज/एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे नाव लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट (**'आरटीए'**) कडून कंपनीला प्राप्त झालेल्या लाभार्थी मालकांच्या सूचीमध्ये नोंदवली असतील त्या सभासदांना फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून टपाल मतदानाची सूचना ५ मे, २०२६ रोजी पाठवली. त्यानुसार, ह्या टपाल मतदानासाठी सभासदांना टपाल मतपत्रिका आणि आगाऊ प्रदान केलेल्या व्यावसायीक जवाबी पाकिटासह सूचनेची प्रत्यक्ष प्रत पाठवली नाही. कंपनीने ५ मे, २०२६ रोजी सदर सूचना पाठवणे पूर्ण केले.

कंपनीने तिच्या सभासदांना रिमोट ई–व्होटींग सुविधा परवण्यासाठी एनएसडीएलची सेवा नियुक्त केली आहे. रिमोट ई–व्होटींग कालावधीची सुरूवात **बुधवार ६ मे, २०२६ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे)** पासून होईल आणि **गुरुवार ४ जून, २०२६ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे)** समाप्त होईल. त्यानंतर एनएसडीएलकडून ई–व्होटींग मॉड्युल निष्क्रीय केले जाईल. सभासदांचे मतदान अधिकार कट–ऑफ डेट रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलात त्यांनी धारण केलेल्या समभागांच्या प्रमाणात असतील. ठरावावर एकदा का मत दिले की, सभासदांना त्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. कृपया ध्यानात ठेवावे की, सभासदांच्या होकार किंवा नकाराचे दळणवळण फक्त रिमोट ई–व्होटींग सिस्टीममार्फत होईल. फक्त ज्यांची नावे कट–ऑफ डेट रोजीस सभासदांच्या नोंदवहीत/डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या सूचित असतील तेच सभासद रिमोट ई–व्होटींगने त्यांची मते देण्यास हक्कदार असतील.

सभासदांना ही सूचना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने प्राप्त करता यावी यासाठी कंपनीने एमसीए सर्क्युलर्सच्या बाबतीत ई–मेल अँड्रेसेसच्या नोंदणीसाठी त्यांच्या आरटीएशी व्यवस्था केली आहे. ज्या सभासदांनी त्यांच्या डिपॉझिटरीजकडे त्यांचे ई–मेल अँड्रेसेस नोंदवले नाहीत त्यांनी ते सोमवार २५ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सं. ५.०० वा. पर्यंत आरटीएकडे नोंदवावेत ज्या आधारे, एनएसडीएल सभासदांना सूचनेची प्रत पुरवेल. आरटीएकडे ई–मेल अँड्रेस नोंदवण्याची प्रक्रिया आणि रिमोट ई–व्होटींग साठीची प्रक्रिया सूचनेमध्ये दिलेली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने टपाल मतदान प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून मे. पारिख अँड असोसिएटस, व्यावसायीक कंपनी सेक्रेटरीजच्या श्री. पी. एन. पारिख (सभासदत्व क्र. एफसीएस ३२७, सीओपी क्र. १२२८) किंवा ते नसल्यास, श्रीमती जिग्यासा एन. वेद (सभासदत्व क्र. एफसीएस ६४८८, सीओपी क्र. ६०१८) यांची नियुक्ती केली आहे.

तपासणी अधिकारी, टपाल मतदानासाठी ई–व्होटींग संपल्याच्या दोन कामाच्या दिवसात टपाल मतदानाच्या निकालावर दिलेल्या मतांची पडताळणी केल्या नंतर कंपनीच्या अध्यक्षांकडे किंवा संचालक मंडळाने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडे त्यांचा अहवाल सादर करतील. दिलेल्या मतांच्या वैधतेवरील तपासणी अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल. तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासह टपाल मतदानाने आयोजित केलेल्या मतदानाचा निकाल टपाल मतदानासाठी ई–व्होटींग संपल्याच्या दोन कामाच्या दिवसात कंपनीची वेबसाईट www.tatacapital.com वर आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध केला जाईल आणि कंपनीचे रोखे जेथे सूचिबध्द आहेत त्या बीएसई आणि एनएसईला कळवला जाईल. त्याशिवाय, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावर सुध्दा निकाल लावला जाईल.

कोणत्याही चौकशीच्या बाबतीत, सभासद investors@tatacapital.com येथे कंपनीला लिहू शकतात. सभासद www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन येथे उपलब्ध भागधारकांसाठी फ्रिक्वेंटली आस्कड क्वेश्चन्स (एफएक्युज) आणि भागधारकांसाठी ई–व्होटींग युजर मॅन्युअल सुध्दा पाहू शकतात किंवा टोल फ्री. क्र.: ०२२–४८८६७००० वर कॉल करू शकतात किंवा evoting@nsdl.com येथे श्री. सुकेश शेट्टी, असिस्टंट मॅनेजर, एनएसडीएल शी संपर्क साधू शकतात.

संचालक मंडळाच्या आदेशावरून

टाटा कॅपिटल लिमिटेडसाठी

सही/–

सरिता कामथ

ठिकाण: मुंबई

दिनांक: ५ मे, २०२६ **चिफ लिगल अँड कॉम्प्लायन्स अँड कंपनी सेक्रेटरी**

ई–लिलाव नि विक्री करिता जाहीर सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ''ॲक्ट'') अंतर्गत आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड (आयआयएफएल–एचएफएल) कॉर्पोरेट कार्यालय येथे प्लॉट क्र. ९८, उद्योग विहार, फेज–IV, गुरगाव – १२२०१५ (हरियाणा) आणि **शाखा कार्यालय येथे:– कार्यालय क्र. १०७ आणि १०८, ए विंग, १ला मजला, प्राईड सिलिकॉन प्लाझा, चतुश्रृंगी मंदिराच्या पुढे, एस बी रोड, पुणे ४११०१६** कडे गहाण स्थावर मिळकतीची विक्री. ज्याअर्थी आयआयएफएल–एचएफएल चा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (एओ) आयआयएफएल–एचएफएल ची थकबाकी वसुल करण्यासाठी **'जे आहे जेथे आहे तत्वाने, जे आहे जसे आहे तत्वाने आणि विना अवलंब तत्वाने'** तिच्या विक्रीच्या हक्कासह खालील कर्ज खाते/प्रॉस्पेक्ट क्र. मधील ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत जारी सूचनेला अनुसरून खालील मिळकत/तींचा कब्जा घेतला आहे. विक्री वेबसाईट: www.iiflonehome.com येथे पुरविलेल्या ई–लिलाव फ्लॅटफॉर्म मार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

कर्जदार/ सह–कर्जदार/ हमीदार	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	स्थावर मिळकत/ तारण मत्तेचे वर्णन	प्रत्यक्ष कब्जाची तारीख	राखीव किंमत
श्री देवेंद्र नारायण केदार श्रीम. वैशाली सतीश ताडे **(प्रॉस्पेक्ट क्र.–आयएल १०४७६५५३)**	०४/१२/२०२५ **रु. ११४५६३९/–** (रुपये अकरा लाख पंचेचाळीस हजार सहाशे एकोणचाळीस मात्र) / बोली वाढ रक्कम **रु. २५,०००/–** (रुपये पंचवीस हजार मात्र)	फ्लॅट क्र. ३०४ धारक, तिसऱ्या मजल्यावर, कार्टस् अशी ज्ञात इमारत क्र. ए३, गट क्र. ६९७ वर बांधकामित, गाव– कारेगाव, तालुका– शिरूर, जि.– पुणे, महाराष्ट्र, भारत, ४१२२२० येथील मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग. क्षेत्र मोजमापित (चौ. फू. मध्ये): मिळकतीचा प्रकार: क्षेत्र मोजमापित, बिल्ट अप क्षेत्र, मिळकत क्षेत्र: २७५.००, ३७१	१३/०४/२०२६ / **एकूण थकबाकी** ०९/०४/२०२६ रोजी **रु. १२०१७०२.४७/–** (रुपये बारा लाख एक हजार सातशे दोन आणि सत्तेचाळीस पैसे मात्र)	**रु. १२०२०००/–** (रुपये बारा लाख दोन हजार मात्र) / **इसारा अनामत रक्कम (ईएमडी)** रु. १२०२००/– (रुपये एक लाख वीस हजार दोनशे मात्र)

मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख :	इअर शेवटची तारीख	ई–लिलावाची तारीख/वेळ
०५–जून–२०२६ स. ११:०० ते दु. १४:००	०८ जून, २०२६ सायं. ५ पर्यंत	१० जून, २०२६ स. ११:०० ते दु. १३:०० पर्यंत

प्रदानाचे माध्यम: ईअरचे प्रदान मात्र ऑनलाईन पद्धतीने करावे. प्रदानासाठी तुम्ही https://www.iiflonehome.com ला भेट द्यावी आणि मिळकत/तारण मत्तेकरीता मात्र उपलब्ध लिंकद्वारे प्रदान करावे. **टीप:** प्रत्येक मिळकत/तारण मत्तेकरीता प्रदान लिंक वेगवेगळी आहे. तुम्ही जाहीर लिलावाद्वारे तुम्ही खरेदी करण्यास इच्छुक मिळकत/तारण मत्तेची लिंक वापरत असल्याची खात्री करावी. उर्वरीत प्रदानाकरिता– http://www.iiflonehome.com>My Bid>Pay Balance Amount यावर लॉगीन करावे.

अटी आणि शर्ती:–

१. ई–लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छुक बोलीदारांनी सेवा पुरवठादार https://www.iiflonehome.com/ कडे त्यांचा तपशील नोंदविणे आणि लॉगईन अकाऊंट, लॉगईन आयडी आणि पासवर्ड तयार करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदारांनी वरील नमूद शाखा कार्यालयात इअरसाठी प्रदानाचा तपशील केवायसी आणि पॅन कार्डच्या प्रतींसह त्यांचे ''निविदा प्रपत्र'' पाठविणे/सादर करणे आवश्यक आहे.
२. बोलीदारांनी रकाना ''बोली वाढविण्याची रक्कम'' मध्ये नमूद रकमेच्या पटीत त्यांचे प्रस्ताव वाढविणे आवश्यक आहे. जर बोली लिलावाच्या समाप्तीच्या वेळेच्या अंतिम ५ मिनिटांमध्ये केल्यास, समाप्तीचा वेळ आपोआप ५ मिनिटांकरीता विस्तारित होईल.
३. यशस्वी बोलीदारांनी एओ यांनी बोली मुल्य स्विकारल्यापासून २४ तासांत (इअर समायोजित केल्यानंतर) बोली रकमेच्या २५% आणि बोली रकमेच्या उर्वरित ७५% तारण धनकोंनी विक्री निश्चित केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे. सर्व जमा आणि प्रदान हे प्रदानाच्या विहित माध्यमाने करायचे आहे.
४. खरेदीदाराने सेस, प्रयोज्य मुद्रांक, शुल्क आणि कोणतीही अन्य वैधानिक थकबाकी किंवा इतर थकबाकी जसे की पालिका कर, वीज प्रभार, जमीन आणि मिळकतीशी संबंधित सर्व कर आणि दरासह इतर अनुषांगिक खर्च, प्रभार भरायचे आहेत.
५. खरेदीदारांना विक्री रकमेच्या व्यवहार/प्रदानाकरिता जो प्रयोज्य असेल तो टीडीएस भरावा लागेल आणि आयआयएफएल एचएफएलकडे टीडीएस प्रमाणपत्र जमा करावे लागेल.
६. **बोलीदारांना ई–लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यासाठी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्री आणि लिलाव अर्ज प्रपत्राच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता वेबसाईट https://iiflonehome.com आणि https://www.iifl.com/home-loans/properties-for-auction मार्फत जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे.**
७. **तपशील, मदत प्रक्रिया आणि ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता संभाव्य बोलीदार सेवा पुरवठादार ई–मेल आयडी : care@iiflonehome.com, सपोर्ट हेल्पलाईन क्र. 1800 2672 499 यांना संपर्क करू शकता.**
८. **मिळकतीचा तपशील, मिळकतीचे निरिक्षण आणि ऑनलाईन बोली इ. च्या संबंधित कोणत्याही शंकेकरीता आयआयएफएल एचएफएल टोल फ्री क्र. १८०० २६७२ ४९९ येथे स. ०९.३० वा. ते १८:०० वा. रोजी सोमवार ते शुक्रवार दरम्यान संपर्क किंवा ईमेल: care@iiflonehome.com येथे ईमेलद्वारे संपर्क करू शकतात.**
९. वरील सदर कर्जदारांना ७ दिवसांत प्रत्यक्ष कब्जा घेतेवेळी तारण मत्तेमध्ये पडलेल्या घरगुती वस्तु घेवून जाण्यासाठी सूचना याद्वारे देण्यात येत आहे. अन्यथा आयआयएफएल–एचएफएल कोणत्याही परिस्थितीत मिळकतीच्या नुकसानीसाठी जबाबदार राहणार नाही.
१०. पुढे कर्जदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, जर त्यांनी सदर वस्तु घेवून जाण्यास कसूर केली तर वरील सदर वस्तु कायद्यानुसार विकण्यात येतील.
११. वरील विहित वेळेत यशस्वी बोलीदार/लिलाव खरेदीदाराने कोणत्याही टप्प्यावर प्रदानात कसूर केली तर विक्री रद्द करण्यात येईल आणि अगोदर जमा केलेली रक्कम (इअर समाविष्टीत) जप्त करण्यात येईल आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल.
१२. एओ यांनी कोणतेही कारण न देता निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्ती बदलणे किंवा पुढे ढकलणे/रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. निविदा/लिलावामध्ये कोणताही वाद झाल्यास आयआयएफएल–एचएफएलच्या एओचा निर्णय अंतिम राहील.

सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ८(६) अन्वये ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना

कर्जदारांना निविदा/लिलावाच्या तारखेपूर्वी तारखेपर्यंत व्याज आणि अनुषांगिक खर्चासह वरील नमूद रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे सूचीत करण्यात येत आहे, कसूर केल्यास मिळकतीच्या लिलाव/विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी काही असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल करण्यात येईल.

ठिकाण: पुणे, दिनांक: ०६/०५/२०२६ **सही/– प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड.**

Muthoot Homefin मुथूट होमफिन (इंडिया) लि.

सीआयएन: यु६५९२२केएल२०११पीएलसी०२९२३१

कॉर्पोरेट कार्या.: मुथूट होमफिन (इंडिया) लि., १९/ई, द रूबी, सेनापती बापट मार्ग, तुलसी पाईप रोड, रूपारेल कॉलेज जवळ, दादर पश्चिम, मुंबई – ४०००२८.

शाखा कार्यालय: मुथूट होमफिन (इंडिया) लि., ५०२, ५ वा मजला, रिद्धी आर्केड, वाय के नगर, नारंगी बायपास रोड, विरार पश्चिम – ४०१३०३.

परिशिष्ट –IV–ए (नियम ८(६) च्या तरतुदी पहा)

खाजगी करारासह विक्रीसाठी जाहीर सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये मुथूट होमफिन (इंडिया) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे खाली वर्णन केलेल्या तारण मत्तेचा कब्जा घेतल्यानुसार खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीच्या खरेदीकरिता मोहोरबंद लिफाफ्यामधून निम्नस्वाक्षरीकारांद्वारे कर्जदारांकडून देय रकमेच्या वसुलीकरिता प्रस्ताव मागवित आहेत, ज्याचा कब्जा **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	कर्जदार/ सह–कर्जदार/ हमीदार/ कर्ज खाते क्र./शाखा	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	स्थावर मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत	इसारा अनामत रक्कम (इअर) (रा.किं. चे १०%)
१.	राज सुब्बैय्या आणि मुथुलक्ष्मी राज सुब्बैय्या / ००२–००२०२२०१ / मुंबई	२२–मे–२०२३ / रु. ५,५८,०६५/– रुपये पाच लाख अठ्ठावन हजार पासष्ट मात्र	फ्लॅट क्र. २०२, २ रा मजला, विंग–सी, चंडिका पार्क–३, वाकीपाडा, इंडो जर्मन कंपनी जवळ, पाझर तलाव, नायगाव (पूर्व), महाराष्ट्र – ४०१२०८	रु. ८,००,०००/– रुपये आठ लाख मात्र	रु. ८०,०००/– रुपये ऐंशी हजार मात्र
२.	चंद्रशेखर कन्हैयालाल यादव / सुदामा देवी शेखर यादव / ००२–०००००८६४ / मुंबई	०९–एप्रिल–२०२१ / रु. १२,२७,०९९/– रुपये बारा लाख सत्तावीस हजार नव्याण्णव मात्र	फ्लॅट क्र. ३०४–बी, विंग, ३ रा मजला, क्षेत्रफळ ४८५.९४ चौ. फूट, बांधकाम क्षेत्र, इमारत क्र. ३, प्रकार–ए, ए२, बी, बसंत कुंज आयडियल सिटी, सर्व्हे क्र. १९८, उमरोली पूर्व रेल्वे स्टेशन समोर, गाव उमरोली, पालघर – ४०१४०४, ज्याचे अधिक तपशील विक्री करारनाम्यात नमूद असून दस्तऐवज क्र. ५४४६/२०१६, दिनांक १४/१०/२०१६ रोजी संयुक्त उप–नोंदणी अधिकारी, पालघर यांच्या कार्यालयात नोंदणीकृत आहे.	रु. ८,००,०००/– रुपये आठ लाख मात्र	रु. ८०,०००/– रुपये ऐंशी हजार मात्र

१. लिलाव **''जे आहे जेथे आहे'' आणि ''जे आहे जसे आहे''** तत्वाने करण्यात येणार आहे.
२. लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती विहित निविदा प्रपत्रात नमूद केलेल्या आहेत, जे वरील नमूद क्षेत्रिय कार्यालयात उपलब्ध आहेत.
३. केवायसीसह **''मुथूट होमफिन (इंडिया) लि.''** च्या नावे डिमांड ड्राफ्ट स्वरुपात देय इअरसह विहित निविदा प्रपत्रातील मोहोरबंद बोली/प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख येथील वरील नमूद प्रादेशिक कार्यालयात **२६–मे–२०२६ रोजी सायं. ०४.००** पर्यंत आहे. पूर्णपणे न भरलेल्या किंवा अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा अवैध निविदा म्हणून समजण्यात येतील आणि त्यानुसार फेटाळण्यात येतील. इअरवर व्याज दिले जाणार नाही.
४. स्थावर मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख **२५–मे–२०२६ रोजी दु. ०१.०० ते दु. ०३.००** दरम्यान आहे.
५. मिळकतीसाठी बोली/प्रस्ताव उघडण्याची तारीख, लिलावाची तारीख प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे वरील नमूद विभागीय कार्यालयाच्या पत्त्यावर **२७–मे–२०२६** रोजी **दु. ०१.०० वा** पर्यंत असेल.
६. एमएचआयएल हि कोणतीही थकीत सांविधिक सूचना आणि काही असल्यास भार/थकीत कर इ. प्रदान करण्यासाठी जबाबदार राहणार नाही आणि यशस्वी लिलाव खरेदीदार त्या रकमेचे प्रदान करण्यासाठी जबाबदार राहतील. इच्छुक बोलीदारांनी मिळकतीचे नामाधिकार, भारांच्या संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आणि निरिक्षण करुन स्वत:चे समाधान करणे आवश्यक आहे.
७. उच्चतम बोलीदार हे एमएचआयएलच्या मंजुरीच्या अधीन राहतील. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता प्राप्त झालेले सर्व किंवा कोणतेही प्रस्ताव स्वीकारण्याचा हक्क राखून ठेवला आहे. त्यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.
८. कर्जदार/हमीदार यांना लिलावाच्या तारखेपूर्वी वरील नमूद रक्कम प्रदान करण्यासाठी सरफैसी ॲक्ट, २००२ अन्वये याद्वारे १५ दिवसांची विक्री सूचना देण्यात येत आहे. कसूर केल्यास स्थावर मिळकतीचा लिलाव करण्यात येईल आणि उर्वरित काही असल्यास व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कर्जदारांनी जर विक्रीच्या तारखेपूर्वी संपूर्ण थकबाकी मुथूट होमफिन (इंडिया) लि. ला प्रदान केली तर लिलाव रद्द करण्यात येईल.

पुढील तपशीलासाठी संपर्क व्यक्ती –**सुरेश माने – ७३०४४६८८९६** यांना वरील नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर साधावा.

दिनांक : मे ०६, २०२६, **सही/– प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण: नायगाव, पालघर **मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड**

TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK

नोंदणीकृत कार्यालय : टीजेएसबी हाऊस, प्लॉट क्र.बी ५, रोड क्र.२, वागळे इंडस्ट्रीयल ईस्टेट, ठाणे (पश्चिम)-४००६०४, ☎ ०२२-६९३६८५००.

मुख्य वसुली कार्यालय : टीजेएसबी सहकारी बँक लि. मधुकर भवन, रिकव्हरी डिपार्टमेंट, ३ रा मजला, वागळे इस्टेट रोड नं.१६, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४. ☎ ०२२-६९९७ ८५९९/७५२/७०१.

जाहीर लिलाव

मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ च्या कलम ८४ अंतर्गत लवाद निर्णयाअंतर्गत स्थावर आणि जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी १५ दिवसांची लिलाव सूचना, लवाद प्रकरण क्रमांक ARB/TJSB/SVT/01 OF 2023, ARB/TJSB/SVT/02 OF 2023, ARB/TJSB/SVT/03 OF 2023, ARB/TJSB/SVT/04 OF 2023, ARB/TJSB/SVT/05 OF 2023, ARB/TJSB/SVT/06 OF 2023 मध्ये माननीय लवाद श्री. एस. व्ही. तिनईकर यांनी ०७.०८.२०२४ रोजी मंजूर केली.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार अधिकार प्राप्त बँकेच्या **विक्री/वसुली अधिकाऱ्यांमार्फत** खालील थकबाकीदार कर्जदारांविरुद्ध वसुलीची कारवाई सुरु केली आहे आणि त्यांनी **१६.१२.२०२४** रोजी खाली दिलेल्या तक्त्यात तपशीलांनुसार **मागणी सूचना** जारी केली आहे.

कर्जदार, गहाणखतदार आणि जामीनदारांनी **मागणी सूचनेत** नमूद केलेल्या रक्कमा विहित कालावधीत परत केल्या नाहीत म्हणून, **विक्री/वसुली अधिकाऱ्यांनी** खाली नमूद केल्याप्रमाणे **स्थावर/जंगम मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

मी, निम्नस्वाक्षरीकार, **मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ च्या कलम १७ अंतर्गत माननीय केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली** यांनी अधिकार दिलेला विक्री/वसुली अधिकारी म्हणून विहित कायद्यांमध्ये नमूद केल्यानुसार निविदा मागवून **"जसे आहे जिथे आहे आधारावर", "जसे आहे जे आहे आधारावर" आणि "कोणत्याही आधार/स्त्रोताशिवाय"** खालील नमूद गहाण मालमत्ता विकण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जदार /जामीनदार / गहाणखतदार यांचे नाव	मागणी सूचना तारीख आणि थकीत रक्कम	राखीव रक्कम आणि इसारा अनामत रक्कमेसह स्थावर / जंगम मालमत्तांचे वर्णन
१. मेसर्स. डोनम डियु इंजिनियर्स प्रा. लि., त्यांच्या संचालकांद्वारे :- अ. श्री. कुलकर्णी अभय नरहर ब. सौ. कुलकर्णी स्मिता अभय ...कर्जदार आणि गहाणखतदार २. श्री. कुलकर्णी अभय नरहर **...जामीनदार** ३. सौ. कुलकर्णी स्मिता अभय **...जामीनदार** **नाशिक वसुली विभाग कर्ज खाते क्र. 142/ADVHYPR/12, 142/PRLNR/8, 142/WCTLR/2, 142/WCTLR/1, 142/CCR/25, 142/CCR/26**	**१६.१२.२०२४** **२१.१२.२०२२** पर्यंतची थकीत रक्कम **रु. ९,६५,५६,८७१.१९** (त्यावरील व्याज, आनुषंगिक खर्चासह, खर्च आणि त्यावरील शुल्क)	**भूखंड आणि इमारत त्याचबरोबर प्लांट आणि मशीनरी आणि भंगार** यांसहित सर्व खंड आणि तुकडे **प्लॉट क्र. एच-२९**, अतिरिक्त मुरबाड औद्योगिक क्षेत्र, कुडवली, मुरबाड, जिल्हा ठाणे येथे स्थित मालमत्ता. **(अंदाजित क्षेत्रफळ सुमारे ३,५८९ चौ.मीटर्स आणि इमारतची अंदाजित क्षेत्रफळ सुमारे २७१६.४३ चौ.मीटर्स)** **एकत्रित राखीव रक्कम - रु. ५,२८,०१,०६५.००** **एकत्रित इसारा अनामत रक्कम - रु. ५२,८०,१०७.००**
लिलावाचे ठिकाण :	**टीजेएसबी सहकारी बँक लि. मधुकर भवन, रिकव्हरी डिपार्टमेंट, ३ रा मजला, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट रोड नं.१६, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४**	
मालमत्तेच्या निरीक्षणाचे दिनांक आणि वेळ	**२१.०५.२०२६, स.१०.०० ते सायं.०५.०० वा. दरम्यान**	
मालमत्तेच्या लिलावाचा दिनांक आणि वेळ	**०४.०६.२०२६, स.१०.३० वा.**	

अटी व शर्ती:

१. ठळकपणे **"भूखंड आणि इमारत त्याचबरोबर प्लांट आणि मशिनरी आणि स्क्रॅप" प्लॉट क्र.एच-२९, अतिरिक्त मुरबाड औद्योगिक क्षेत्र, कुडवली, मुरबाड यांच्या मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्ताव"** असे लिहिलेल्या एका खरेदीसाठी एका मोहोरबंद पाकिटातून प्रस्तावांना ठेवून सदर प्रस्तावाचे मोहरबंद पाकिट **"टीजेएसबी सहकारी बँक लि. मधुकर भवन, रिकव्हरी डिपार्टमेंट, ३ रा मजला, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट रोड नं.१६, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४"** या ठिकाणी **दि.०३.०६.२०२६** रोजी **सायं. ५.००** पूर्वी आणावेत आणि **दि.०३.०६.२०२६ सायं.५.००** पूर्वी ईएमडी रक्कम **आरटीजीएस/एनईएफटीद्वारे खाते क्र. 001995200000003**, आयएफएससी कोड **TJSB0000001** मध्ये हस्तांतरित करावी.
२. निम्नस्वाक्षरीकारांकडून अशा तऱ्हेने प्राप्त झालेले प्रस्ताव लिलावाच्या ठिकाणी **दि.०४.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता** उघडून विचारात घेतले जातील.
३. **प्लांट आणि मशिनरी-स्क्रॅपच्या विक्रीवरील जीएसटी अंतिम बोली रकमेच्या यशस्वी बोलीदाराने भरावा.**
४. खाली स्वाक्षरी केलेले याद्वारे कर्जदार/गहाणखतदार/ना, आणि/किंवा कायदेशीर वारसांना, कायदेशीर प्रतिनिधी (ते) (मग ते ज्ञात असोत किंवा अज्ञात), निष्पादक(चे), प्रशासक(चे), उत्तराधिकारी (ते) आणि नियुक्त (ने) यांना सूचित करतात संबंधित कर्जदार/गहाणखतदार (ने) (मृत असल्यास) किंवा फरार, यथास्थिती, नोटीसच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत संपूर्ण थकबाकी भरणा करावी. अन्यथा **विक्री/वसुली अधिकारी MSCS कायदा, २००२** च्या नुसार येथे नमूद केलेली सुरक्षित मालमत्तेची विक्री करण्यात येईल.
५. सर्व किंवा अशा कोणत्याही व्यक्ती (व्यक्तींना) या मालमत्तेबाबत वाटा, हक्क, शीर्षक, लाभ, व्याज, दावा किंवा मागणी यांच्या उक्त मालमत्तांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, वाटप, देवाणघेवाण, गहाण, भाडे, पोट-भाडे, भाडेपट्टी, धारणाधिकार, शुल्क, देखभाल, परवाना, भेटवस्तू, वारसा, वाटा, ताबा, सहजता, विश्वास, वसीयत ताबा, असाइनमेंट किंवा कोणत्याही स्वरूपाचा भार किंवा अन्यथा खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरीत लेखी कळवावे अशी विनंती केली जात आहे. जाहिरात प्रकाशित झाल्यापासून **०७ दिवसांच्या** आत सर्व आवश्यक आणि सहाय्यक दस्तऐवजांसह, अशा दाव्याचा संदर्भ न देता कोणता व्यवहार पूर्ण केला गेला नाही तर अशा कोणत्याही व्यक्तीने त्याचे अधिकार माफ केले आहेत असे मानले जाईल आणि **टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड** वर बंधनकारक राहणार नाही.
६. अटी आणि शर्तींच्या पत्रकासह निविदा प्रपत्रे **रु १००/- अधिक जीएसटी रु. १८/-, एकूण रु.११८/-** किंमतीसह **वसुली/विक्री अधिकाऱ्यांच्या** कार्यालयात स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत.
(संपर्क क्रमांक -९७६२०३१५८०/८४२२९१८०८४/९९६९५४९८२७/०२२-६९९७ ८५९९/७००/७०१)
७. कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/किंवा लिलाव रद्द करण्याचे आणि/ किंवा सुधारण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.
८. बँकेकडूनच लिलाव निश्चित केला जाईल. बँकेने कोणताही व्यक्ती किंवा एजन्सी नियुक्त केलेली नाही.

हे प्रकाशन म्हणजे उपरोक्त कर्ज खात्यांच्या कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

सही/-

(विक्री/वसुली अधिकारी)

MSCS कायदा, २००२ च्या कलम १७ अंतर्गत

टीजेएसबी सहकारी बँक लि. च्या साठी आणि वतीने

दिनांक : ०६.०५.२०२६

ठिकाण : ठाणे.

शिक्का

*उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.